MHPA220004502022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २२/०६/२०२२ |
| नोंदणी तारीख | : | २२/०६/२०२२ |
| निकाल तारीख | : | ०६/०६/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०३ ११ १५ |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**पालम येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी मनिषा म. पाटील)**

**(जाहीर दिनांक – ०६/०६/२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ११४/२०२२**

(गु.र.क्र.३९/२०२२ पालम पोलीस ठाणे)

**निशाणी क्रमांक – ३६**

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र सरकार तर्फे**
**पोलीस निरीक्षक,**
पालम पोलीस ठाणे, ता. पालम, जि. परभणी

**प्रतिनिधीत्व** **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एन. डावकरे**

**आरोपी** **गजानन रामचंद्र आकनगिरे**
वय – ४४ वर्षे, व्यवसाय– मजुरी
रा. खडी, ता. पालम, जि. परभणी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपीकरीता वकील श्री. एस. आर. रोकडे**

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १९/०२/२०२२ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | १९/०२/२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २२/०६/२०२२ |

| | |
|---|---|
| आरोपीविरूध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | २८/०८/२०२४ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०३/०१/२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | लागु नाही |
| निकालाची तारीख | ०६/०६/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गजानन रामचंद्र आकनगिरे | २२.०२.२०२२ | २२.०२.२०२२ | महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५–ई अन्वये | निर्दोष मुक्त केले. | –– | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | नामदेव ऊमाजी राठोड | फिर्यादी |
| अ.सा.२ | सुधाकर मलबा भसमपुरे | जप्ती पंच साक्षीदार |

## ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २७/अ.सा.क्र.१ | जप्ती पंचनामा |
| २ | २८/अ.सा.क्र.१ | फिर्याद |
| ३ | २९/अ.सा.क्र.१ | प्रथम खबरी अहवाल |
| ४ | ३१/अ.सा.क्र.२ | अ.सा.क्र. २ ची जप्ती पंचनाम्यावरील सही |
| ५ | ३५ | रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल |

## ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | -- | १८० मि. ली. मापाच्या देशी दारू भिंगरी संत्राच्या ४० बाटल्या |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक ०६/०६/२०२६)

प्रस्तुतचा खटला हा आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

०२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे-**

दिनांक १९/०२/२०२२ रोजी यातील फिर्यादी नामदेव उमाजी राठोड यांना मिळालेल्या बातमीनुसार त्यांनी व इतर पोलीस कर्मचारी यांनी मौजे खडी, ता.पालम, जि.परभणी येथील आरोपीच्या घरासमोर १६.०५ मिनीटांनी वाजता छापा टाकला असता आरोपी तेथुन पळुन गेला. आरोपीने त्याच्या ताब्यात विना परवाना चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेला देशी दारू भिंगरी संत्राच्या ४० सिलबंद बाटल्या आरोपीच्या घरासमोरील नाहणीजवळ मिळून आल्या म्हणुन आरोपीविरुध्द फिर्याद दाखल करण्यात आली.

०३. सदर फिर्यादीवरून आरोपीविरुध्द गु.र.नं. ३९/२०२२ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी पो.ना./९८८ वाटोडे, पालम पोलीस ठाणे यांनी सदर गुन्ह्याचे तपासकाम केले. त्यांनी तपासकामी साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पुर्व अधिकारी यांनी नि. ११ कडे आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) या अन्वये गुन्ह्याचा दोषारोप ठेवला. आरोपीने गुन्हा नाकबुल करून संपरिक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायानिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद साक्षी पुराव्यांचा आधार घेतला आहे. यापलीकडे अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांना उर्वरीत साक्षीदारांना न्यायालयात उपस्थित ठेवण्यात यश न आल्याने त्यांचा पुरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून आला असल्यामुळे आरोपीचे निवेदन नोंदवण्यात आले.

०५. अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ श्री. एस. एन. डावकरे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस. आर. रोकडे यांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे प्रस्थापित केले आहेत. सदरचे मुद्दे व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. १९/०२/२०२२ रोजी १६.०५ वाजण्याच्या सुमारास मौजे खडी, ता. पालम, जि. परभणी येथे आरोपी हा त्याच्या राहत्या घराच्या न्हानी जवळ देशी दारू भिंगरी संत्राच्या १८० मि. ली. मापाच्या एकुण ४० सिलंबद बाटल्या बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगुन असताना मिळून आला, म्हणून त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | अंतिम आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> –**

०६. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील नियमांचे उल्लंघन करून मादक द्रव्य (अफु किंवा भांग व्यतिरीक्त) विक्री केले आहे किंवा विकत घेतले आहे किंवा ताब्यात बाळगलेले आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये आरोपीने गुन्हा केला आहे हे अभियोग पक्षाने शाबीत केले किंवा कसे हे तपासण्यासाठी अभियोग पक्षाने याकामी सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन होणे आवश्यक आहे.

०७. अभियोग पक्षातर्फे तपासलेले सा.क्र. १ नामदेव (नि.२६) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दि. १९/०२/२०२२ रोजी ते पोलीस स्टेशन पालम येथे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यादिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त ते आणि अन्य पोलीस कर्मचारी दुरक्षेत्र चाटोरी येथे पेट्रोलींग करत होते. त्यावेळी त्यांना आरोपी हा चोरट्या दारूची विक्री करत असल्याची बातमी मिळाली म्हणुन ते त्यांच्या मोटार सायकलवरून मौजे खडी येथे गेले व तेथे दोन पंचांना बोलावुन घेतले. त्या पंचांना झडतीचा उद्देश सांगुन त्यांनी १६.०५ वाजता आरोपीच्या घराची झडती घेतली असता त्याच्या घरासमोरील न्हानी जवळ एका खताच्या पिशवीत देशी दारू भिंगरी संत्राच्या १८० मि. ली. मापाच्या एकुा ४० बाटल्या त्यांना मिळुन आल्या. त्या बाटल्या त्यांनी दोन पंचांसमक्ष जप्त केल्या आणि त्याचा सविस्तर पंचनामा (नि.२७) केला. मिळालेल्या मुद्देमालातील एक बाटली ही सि. ए. तपासणीकरिता काढुन घेतली. त्या दरम्यान आरोपी हा तेथुन पळुन गेला. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला येऊन सरकारतर्फे आरोपीविरूध्द फिर्याद (नि.२८) दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रथम खबरी अहवाल (नि.२९) दाखल करण्यात आला. मुद्देमालाची पावती (नि.२) करून त्यांनी तो मुद्देमाल पोलीस स्टेशनला जमा केला. उलटतपासामध्ये त्यांनी, पंचांना नोटीसा दिल्या नसल्याचे मान्य केले आहे. जप्त मुद्देमालाचा निर्मीती क्रमांक उत्पादीत तारीख, बॅच नंबर हे त्यांना उलटतपासादरम्यान सांगता आलेले नाही.

०८. अभियोग पक्षाने तपासलेले सदर साक्षीदार हे फिर्यादी असुन पोलीस कर्मचारी आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे कथने केली आहेत. त्यांच्या कथनाप्रमाणे छापा टाकण्याकरिता ते व इतर कर्मचारी हे घटनास्थळी गेले होते. परंतु, अभियोग पक्षाने त्यांच्या कथनांना दुजोरा देण्याकरिता अन्य प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष याकामी नोंदवलेली नाही. आरोपीच्या ताब्यातुन देशी दारू भिंगरी संत्राच्या एकुण ४० बाटल्या मिळुन आल्या आणि त्या त्यांनी जप्त केल्या असल्याचे कथन केले आहे. परंतु, सदर कथनांना दुजोरा देण्यासाठी तपासलेले सा.क्र. २ सुधाकर (नि.३०) यांनी त्यांच्या परस्पर विसंगत कथने केली आहेत. सा.क्र. २ यांनी त्यांच्या सरतपासात पोलीसांनी त्यांना जप्ती पंचनामा करण्याकरिता गावातील शाळेजवळ बोलावले व एका कागदावर सही घेतली असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यावर काय लिहीले होते याची त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी फक्त पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली आहे आणि आरोपी कडुन त्यांच्या समक्ष पोलीसांनी काहीही जप्त केले नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने त्यांना सुचक प्रश्न विचारले असता, त्या दरम्यानही त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य होईल असे कोणतेही कथन केलेले नाही. या उलट त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन देशी दारू भिंगरी संत्राच्या ४० बाटल्या जप्त केल्या असल्याची बाब नाकारली आहे.

०९. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे दोन पंचांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन दारू जप्त केली होती तर सदर सा.क्र. २ यांनी अभियोग पक्षाच्या कथनास विसंगत कथने का केली याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण अभियोग पक्षाने दिलेले नाही.

१०. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यात मादक द्रव्य म्हणजेच दारु मिळून आली हे निसंशयरित्या शाबीत करणे आवश्यक आहे. जर त्याच्या ताब्यातून दारु मिळून आली हे सिध्द झाले तरच त्याच्याविरुध्दचा गुन्हा सिध्द होतो. परंतु, अभियोग पक्षाने जप्ती पंच व फिर्यादी यांची साक्ष वगळता इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर नोंदवलेली नाही.

११. अभियोग पक्षाने याकामी रासायनिक पृथःकरणाचा अहवाल (नि.३५) दाखल केला आहे व गुन्हा सिध्दतेकरीता त्या अहवालावर भिस्त ठेवली आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता, त्या अहवालानुसार प्रस्तुत गुन्ह्यातील मुद्देमाल हा न्याय वैज्ञानिक

प्रयोगशाळा नांदेड यांना दि. ०४/०३/२०२२ रोजी प्राप्त झाला असल्याचे दिसुन येते आणि त्यामुळे त्या नमुन्यामध्ये अल्कोहोलचे प्रमाणही असल्याचे स्पष्ट होते. परंतु, गुन्हा हा दि. १९/०२/२०२२ रोजी घडल्याचे अभियोग पक्षाचे कथन लक्षात घेता त्यानंतर दि. ०४/०३/२०२२ पर्यंत नमुना हा कोणाच्या ताब्यात होता या बाबत कोणताही पुरावा अभियोग पक्षाने पटलावर आणलेला नाही. सदरचा नमुना हा इतक्या दिर्घ कालावधीनंतर का जमा केला याचेही स्पष्टीकरण अभियोग पक्षाने याकामी दिलेले नाही. अभियोग पक्षाने नमुना वाहकचा पुरावा याकामी नोंदवलेला नाही. त्यामुळे नमुना रसायनिक प्रयोगशाळेत पाठवला तर दरम्यानच्या काळात सदरचा नमुना कोणाच्या ताब्यात होता व कोणत्या स्थितीत होता याबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर नाही. मुळात सदरचा नमुना हा घटनेनंतर ते रासायनिक प्रयोगशाळेत जमा करेपर्यंत विना छेडछाड व आहे त्या स्थितीत पाठवलेबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे तो नमुना आहे त्या स्थितीत रासायनिक प्रयोग शाळेत पाठवला असल्याची बाब शंका निर्माण करते. त्यामुळे जरी याकामी रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल दाखल असला तरी त्यावरून आरोपीच्या ताब्यातुन मुद्देमाल मिळुन आला व त्यातील एक बाटली रासायनिक पृथ्थकरणासाठी काढुन ठेवली व ती जप्त केलेल्या स्थितीतच रासायनिक तपासणीकरिता पाठवली असल्याची बाब सिध्द होत नाही.

**१२.** एकंदरीत, वर नमुद विवेचनाअंती आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणे गरजेचे होते परंतु अभियोग पक्षाने तपासलेले सा.क्र.१ हे पोलीस साक्षीदार असुन त्यांना इतर स्वतंत्र साक्षीदाराच्या साक्षीची पुष्टी नाही. जप्ती पंच यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. पंच वगळता अन्य कोणताही स्वतंत्र साक्षीदार याकामी अभियोग पक्षाने तपासलेला नाही. निव्वळ सा.क्र.१ यांच्या कथनावरून आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द होत नाही. अभिलेखावर आरोपीविरूध्दचा गुन्हा हा निःसंशयरित्या सिध्द करणे आवश्यक असते, परंतु, पटलावर आलेल्या पुराव्यात आरोपीविरूध्द गुन्हा संशयावरून दाखल केला असल्याचे दिसुन येते. अभियोग पक्षास आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अपयश आलेले आहे. यास्तव मुद्दा क्र.१ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>** –

**१३.** प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम

६५(ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे.

**१४.** या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील मुद्देमाल रकान्यातील जप्त मुद्देमाल हा न्यायालयासमोर तपासी अधिकारी यांनी हजर केलेला नाही. सदर जप्त मुद्देमाल तपासी अधिकारी यांनी जप्त केल्याचे कथन अभियोग पक्षाने केले आहे. जप्त मुद्देमाल देशी दारू भिंगरी संत्राच्या एकुण ४० बाटल्या ह्या अपिल कालावधीनंतर नाश करणेसाठी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी यांच्याकडे पाठविणेबाबत तपासी अधिकारी यांना आदेशीत करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **गजानन रामचंद्र आकनगिरे** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यामधून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामिनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल देशी दारू भिंगरी संत्राच्या प्रत्येकी १८० मि.ली. मापाच्या ४० बाटल्या ह्या अपील कालावधीनंतर नाश करण्याकरीता अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी यांच्याकडे पाठविण्यात यावी.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे रक्कम रु.५,०००/– चा वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(येणेप्रमाणे न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात येतो.)

MANISHA MAHADEO PATIL

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.06.06 16:23:29 +0530

**दिनांक– ०६/०६/२०२६**

**(मनिषा म. पाटील)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.**